# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १४५–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. शिवनिंगप्पा चनाप्पा माळी,<br>मु. पो. व्हसपेठ, ता. जत, जि. सांगली<br><br>**विरूध्द** | अर्जदार |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. शिवनिंगप्पा चनाप्पा माळी, मु. पो. व्हसपेठ, ता. जत, जि. सांगली यांनी आपली शेती गट क्र. ७१२/२ मध्ये ३ अश्वशक्ती शेतीपंप वीज पुरवठा मिळावा यासाठी वि.प.कडे दि. १६.१.२०१० रोजी अर्ज केला व त्याचदिवशी रु. २५००/– + रु. १५००/– = रु. ४०००/– पावती क्रमांक ५३३७७९० दि. १६.१.२०१० रोजी भरले. त्यांना आजातागायत वीज पुरवठा मिळाला नाही. मंचाचे आदेश मिळताच चाचणी अहवालत देण्याची तयारी दर्शविली आहे. त्यापूर्वी तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र. ७७२ दि. ३०.१.२०१० ला दाखल केली.

तक्रारदाराचे म्हणण्यानुसार सांगली कक्षाने आजतागायत कोणतेही आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे तक्रारदाराने मंचाकडे दि. २९.६.२०१० रोजी तक्रार दाखल केली. तक्रारीमध्ये मंचाला विनंती केली आहे की, एस.ओ.पी. विनियमानुसारच्या कालावधीत वीज पुरवठा मिळावा तसेच सांगली कक्षाने मुदतीत आदेश पारीत न केलेमुळे या तक्रारीसाठी ग्राहकाला मंचाकडे दाद मागावी लागत आहे, ज्यामुळे सर्व यंत्रणेला व ग्राहकाला त्रास सोसावा लागत आहे व ही कृती विनियमा विरीत आहे, याची गंभीर जाणीव द्यावी. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल करण्यात आली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. १९.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी दि. १६.१.२०१० अनामत रक्कम भरल्याचे मान्य केले. त्यांना ४ पोलची लघुदाब वाहिनी लागते. त्यांनी अद्याप चाचणी अहवाल सादर केलेला नाही. चाचणी अहवाल सादर केल्यानंतर विद्युत कंपनीच्या नियमानुसार मुदतीत वीज पुरवठा केला जाईल.

प्रस्तुत तक्रार मंचासमोर दि. २८.७.२०१० ला घेण्यात आली. तक्रारदारातर्फे प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे श्री. भोसले, कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ विभाग व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता उपस्थित. श्री. खापरे यांनी तक्रारदाराने अर्ज करुन चलन भरले आहे, परंतु त्यांना अद्याप विद्युत पुरवठा मिळाला नाही. अंतर्गत कक्षात तक्रार दाखल करुनही आदेश झाले नाहीत. कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे तक्रारदार यांस वीज जोडणी द्यावी त्यासाठी चाचणी अहवाल देण्याची त्यांनी तयारी दर्शविली आहे. उत्तरादाखल वि.प.तर्फे ४ पोलची लघुदाब वाहिनी लागते. तक्रारदाराने चाचणी अहवाल सादर केल्यानंतर त्यांना नियमाप्रमाणे विद्युत पुरवठा केला जाईल. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार यांनी मागणी केल्याप्रमाणे वि.प.ने तक्रारदारास विद्युत पुरवठा देण्याचे आदेश करणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

<u>कारणमिमांसा</u>

उभयबाजूंनी तक्रारदार यांनी शेतीपंपासाठी जरुर ती कायदेशीर फी रु. ४०००/- दि. १६.१.२०१० रोजी भरल्याचे मंचासमोर लेखी/ तोंडी मान्य केले. त्यांना विद्युत पुरवठा मिळाला नाही. चाचणी अहवाल दिल्यानंतर विद्युत पुरवठा देण्यात येईल. कृती मानक तील तरतुदीनुसर तक्रारदार यांस विद्युत पुरवठा देणे आवश्यक होते, तसे झाले नाही. तक्रारदार यांनी चाचणी अहवाल देण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे वि.प.ने चाचणी अहवाल मिळताच संयुक्त तपासणी करुन तक्रारदाराकडून सर्व कागदपत्रांची पूर्तता झालेवर नियमानुसार वीज कनेक्शन द्यावे.

## <u>आदेश</u>

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प.ने तक्रारदार यांनी चाचणी अहवाल दिल्यानंतर व कागदपत्रांची पूर्तता झालेनंतर नियमानुसार त्यांना विद्युत पुरवठा द्यावा.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष